# .महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपुर शहर परिमंडळ, नागपुर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०५५ /२०१०

अर्जदार : श्री तेजनारायण नंदकिशोर पांडे
शॉप नं. १७, रेल्वे स्टेशन च्या समोर
सीताबर्डी,
नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता, सिव्हील लाईन विभाग
म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित,
नागपुर.

गणपुर्ती : १) श्रीमती के.के घरत, सदस्य–सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच, नाशप,
मराविविकंमर्यादित, नागपुर.

२) श्रीमती गौरी चांद्रायण, सदस्या
ग्राहक तक्रार निवारण मंच, नाशप,
मराविविकंमर्यादित, नागपुर.

–– आदेश ––

पारीत दि. ०४.०९.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक २३.०७.२०१० रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम २००६ कलम ६.४ प्रमाणे दाखल केलेला आहे.

<u>अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील</u> :–

१. अर्जदार श्री. तेजनारायण नंदकिशोर पांडे, शॉप नं. १७, रेल्वे स्टेशन च्या समोर, सीताबर्डी नागपुर ऑक्टोबर २००९ पासुन यांनी येणा–या अवाजवी विद्युत देयकाबाबत कार्यकारी अभियंता, सिव्हील लाईन विभाग, गैरअर्जदार यांच्या अंतर्गत असलेल्या विविध कार्यालयात जानेवारी २०१० पासुन पत्र व्यवहार केलेला आहे. परंतु तक्रार अर्जावर गैरअर्जदाराने कुठलीही दखल न घेतल्याने, अर्जदाराने २३.०७.२०१० रोजी मंचात गा–हाणे दाखल केले व विनंती केली आहे की –––

अ) मीटर वाचनानुसार योग्य विद्युत देयक देण्यात यावे.

ब) अधिका–या विरूध्द कार्यवाही करून अर्जदारास योग्य न्याय देण्यात यावा.

क) अवाजवी युनिट रद्द करावे.

२. अर्जदाराने, जानेवारी २०१० मध्ये गैरअर्जदाराला तक्रार अर्ज दिला होता. त्यामध्ये असे नमुद होते की त्यांना विद्युत देयक वेळेवर मिळत नाही व त्यामुळे वेळेवर देयके भरणे त्यांना शक्य होत नाही. तसेच चुकीच्या मीटरवाचनामुळे ऑक्टोबर २००९ पासुन त्यांना अवाजवी देयके देण्यात येत आहे. त्यामुळे मीटरची चाचणी करून विद्युत देयक दुरूस्त करण्यात यावे. सदर तक्रारीवर गैरअर्जदारातर्फे कुठलीही कार्यकाही न झाल्यामुळे अर्जदाराने फरवरी २०१० मध्ये पुन्हा तक्रार अर्ज सादर केला व विनंती केली की मीटरची चाचणी करून विद्युत देयक दुरूस्त करण्यात यावे व दुरूस्त केलेल्या बिलात हप्ते देण्यात यावे. परंतु सदरहु अर्जावर सुध्दा गैरअर्जदाराने दखल घेतली नाही. तेव्हा व्यथित होवुन अर्जदाराने दिनांक २३.०७.२०१० रोजी मंचात गा–हाणे दाखल केले व मंचाला सांगितले की

त्यांना मिळालेले विद्युत देयक दुकानात जोडलेल्या विद्युत भारानुसार नाही. तसेच मार्च २०१० मध्ये मीटर बदलविल्यानंतर विद्युत देयकं योग्य येत आहे. तेव्हा जुनी चुकीची देयके रद्द करून योग्य देयक देण्यात यावे, अशी विनंती अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या पत्रात केलेली आहे.

३. दिनांक ०७.०८.२०१० रोजी गैरअर्जदाराने आपले उत्तर मंचात दाखल केले त्यामध्ये असे नमुद केले आहे की, अर्जदाराचे ग्राहक क्रं. ४१००१६९४९७६४ असुन अर्जदाराचे जोडणी झाल्यानंतर माहे ऑक्टोबर २००९ मध्ये त्यांना दोन महिन्याचे विद्युत देयक देण्यात आले होते. तसेच नोव्हेबंर २००९ ला मीटरचे वाचन उपलब्ध न झाल्यामुळे डिसेंबर २००९ ला दोन महिन्याचे एकत्र देयक संगणकप्रणाली प्रमाणे देण्यात आले आहे आणि अर्जदाराची विज जोडणी तात्पुरत्या स्वरूपाची असल्यामुळे त्या वर्गवारीप्रमाणे विज दर लावुन योग्यरित्या देयक देण्यात आले आहे.

४. गैरअर्जदाराने नमुद केले आहे की ग्राहकाला कुठलेही अवाजवी देयक देण्यात आले नाहीत, तेव्हा अर्जदाराची देयक रद्द करण्याची मागणी अवास्तव आहे. तसेच अर्जदाराच्या मागणी नुसार मीटर क्रंमाक २३५६६०० ची चाचणी २६.०४. २०१० रोजी करण्यात आली व चाचणी अहवालाप्रमाणे ते दोष रहीत आहे. गैरअर्जदाराने असे ही म्हटले आहे की अर्जदाराच्या विनंतीनुसार जुन २०१० पासुन ग्राहक वर्गवारी मध्ये बदल करून तात्पुरती वर्गवारी बदलवुन व्यवसायिक केली आहे. त्यानुसारच विजेची आकारणी होत आहे. तसेच कंपनीच्या अधिका—यांनी वेळोवेळी अर्जदाराच्या तक्रारीची दखल घेतली आहे, त्यामुळे अर्जदाराची दंडात्मक कार्यवाहीची मागणी संयुक्तीक नाही. तेव्हा सदर प्रकरण खारीज करण्याची विनंती गैरअर्जदाराने मंचात दाखल केलेल्या पत्रात केली आहे.

५. दिनांक ०९.०८.२०१० रोजी मंचात सुनावणीची तारीख निश्चित केली होती, परंतु अर्जदाराचे प्रतिनिधीने महत्वाच्या कारणास्तव सुनावणीची कार्यवाही पुढे ढकलण्याची विनंती केली होती. मंचाने अर्जदार प्रतिनिधीची मागणी मंजुर करून दिनांक १७.०८.२०१० ला सुनावणीची कार्यवाही सुरू केली.

दोन्ही पक्ष अपस्थित होते. गैरअर्जदारातर्फे श्री. ए.सी. कठाणे, सहाय्यक अभियंता, सिव्हील लाईन विभाग, हे उपस्थित होते. अर्जदारातर्फे श्री. सुनिल जेकब, अर्जदार प्रतिनिधी, यांनी अर्जदाराची बाजु मांडतांना सांगितले की अर्जदाराला नवीन विज जोडणी नंतर पहिल्यांदा जेव्हा विद्युत देयक दिले ते मीटर वाचनानुसार नव्हते. तसेच अवाजवी विद्युत देयक देवुन अतिरिक्त पैसे गैरअर्जदाराकडुन वसुल केलेले आहेत, त्यामुळे विद्युत देयकामधुन व्याज व डी. पी.सी. रद्द करून योग्य ते देयक देण्यात यावे.

अर्जदार प्रतिनिधीने सुनावणी दरम्यान लिखीत बयान सादर केले. त्यामध्ये असे नमुद केले आहे की सी.पी.एल. वरून असे लक्षात येते की ऑक्टोबर २००९ मध्ये ६६ युनिटचे रू. १३१२.७५ रकमेचे देयक पाठविण्यात आले. तसेच पुढील महिन्यात मीटरचे वाचन घेवुन ६५९ युनिटचे देयक पाठवुन, त्यामधुन फक्त रू. १०७८.६७ वजा करून दिले आहेत व उर्वरीत रक्कमे बद्दल कुठलेही स्पष्टीकरण गैरअर्जदाराने दिलेले नाही. तसेच गैरअर्जदाराचे असेही म्हणणे आहे की त्यांनी २६.०४.२०१० रोजी मीटरची चाचणी केली आहे ती खोटी आहे, कारण कनिष्ठ अभियंता यांनी ३०.०७.२०१० रोजी मीटरचे निरक्षण केले होते, तेव्हा उपविभागीय कार्यालयातर्फे देण्यात आलेला चाचणी अहवाल खोटा आहे, तसेच चाचणी अहवालावर उपविभागीय अधिका—यांचे हस्ताक्षर नाहीत. अर्जदार प्रतिनिधीने नमुद केले आहे की अर्जदाराने जेव्हा चाचणी फी १६.०४.२०१० रोजी भरणा केली होती, तेव्हा कुठल्या कारणास्तव ऑगस्ट २०१० मध्ये एवढया विलंबाने मीटर चाचणी कां करण्यात आली याचे स्पष्टीकरण गैरअर्जदाराने

दयायला हवे होते. तसेच विद्युत देयक जोडलेल्या विद्युत भारानुसार योग्य वाटत नाही आणि अर्जदाराला वेळेवर विद्युत देयक प्राप्त झाले नाही, तेव्हा डी.पी.सी रद्द करण्यात यावी. या सर्व प्रकाराला गैरअर्जदार कारणीभुत असुन विद्युत विनियमानुसार योग्य ती कार्यवाही करून अर्जदाराला न्याय देण्याची विनंती मंचात सादर केलेल्या पत्रात केली आहे. तसेच गैरअर्जदाराच्या अशा वागणुकीसाठी संबंधीत अधिका–यांना दंडीत करण्याची मागणी सुध्दा अर्जदार प्रतिनिधीने केली आहे.

६. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकल्यानंतर व मंचात सादर केलेल्या कागदपत्रांवरून असे स्पष्ट होते की अर्जदाराने त्या मीटर वाचनानुसार विद्युत देयक न देता अवाजवी स्वरूपाचे पाठविण्याबाबत मंचात तक्रार केली आहे. तसेच अर्जदार प्रतिनिधीला मीटर चाचणी अहवालावर संशय आहे, कारण अर्जदाराचे असे मत आहे की चाचणी अहवालावर उपविभागीय अधिका–यांचे हस्ताक्षर नाही. परंतु सुनावणीच्या दरम्यान जेव्हा मंचाने गैरअर्जदाराला हस्ताक्षर विषयी विचारणा केली, तेव्हा त्यांनी सांगितले की मीटर चाचणी अहवालावर संबंधीत कनिष्ठ अभियंता सुध्दा हस्ताक्षर करू शकतात त्यामुळे मीटर चाचणी अहवालावर संशय घेणे योग्य वाटत नाही.

सी.पी.एल. बघता मंचाचे असे मत आहे की, दोन महिने वगळता म्हणजेच सप्टेबर २००९ आणि नोव्हेबर २००९ वगळता इतर महिन्यांत मीटर वाचनानुसार विद्युत देयके तयार करण्यात आले आहेत. तसेच सप्टेबर २००९ व नोव्हेबर २००९ मध्ये जे मीटर वाचन झाले नाही परंतु त्याचे समायोजन त्यांनी पुढील महिन्यात केले आहे. अर्जदार प्रतिनिधीचे म्हणणे आहे की १६ एप्रिल २०१० रोजी मीटर चाचणी फी भरून सुध्दा ऑगस्ट २०१० मध्ये मीटर चाचणी करण्यात आली, मंचात सादर केलेल्या कागदपत्रावरून असे दिसते की मीटरची चाचणी दोनदा करण्यांत आली आहे, एक दिनांक २६.०४.२०१० रोजी आणि दुसरी ०७.

०८.२०१० रोजी. या दोन्ही चाचणी अहवालामध्ये मीटर दोष रहीत असल्याचे नमुद केले आहे. परंतु मंचात सादर केलेल्या २६.०४.२०१० रोजीच्या चाचणी अहवालावर अर्जदार किंवा अर्जदार प्रतिनिधीचे हस्ताक्षर घेतले गेले नाही. त्यामुळे अर्जदार प्रतिनिधीचे २६.०४.२०१० च्या चाचणी नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम, २००५ मधील १४.४.३ "ग्राहकाकडुन मीटरच्या तपासणीसाठी करण्यात आलेल्या विनंतीच्या दिनांकापासुन दोन महिन्यांच्या कालावधीत तपासणी अहवालाची प्रत वितरण परवाना धारक ग्राहकास देईल"**.** या तरतुदीचे गैरअर्जदाराने पालन न केल्याचे लक्षात येते. त्यामुळे गैरअर्जदाराचे वेळोवेळी अर्जदाराच्या तक्रारीची दखल घेतली हे कथन मान्य करता येत नाही. यामुळेच सदर विद्युत देयक दुरूस्तीची तक्रार उद्‌भवली असुन अर्जदारास मानसिक त्रास झाल्याचे मंचाचे मत आहे. या कारणास्तव अर्जदार भरपाईस पात्र आहे.

# आदेश

अर्जदाराची तक्रार अशंतः मंजुर करण्यात येत आहे.

1. गैरअर्जदाराने मीटर वाचनानुसार विद्युत देयक दिल्याने ते योग्य असुन अर्जदाराची अवाजवी युनिट रद्‌द करण्याची मागणी अमान्य करण्यात येते.
2. अर्जदाराला झालेल्या मानसिक त्रासाबद्‌दल रू. ५००/– भरपाई देण्यात येत आहे.

सही/–
(श्रीमती के.के. घरत)
सदस्य–सचिव

सही/–
(श्रीमती गौरी चांद्रायण)
सदस्य्